Date : 31-Jul-2009 | Edition : Mumbai | Page No.: 3 | Page Name: n.a. | Size: 124.87 sq. cm

Sector: Media Entertainment and Broadcasting | Circulation: 90682 | AVE: Rs.0.00 | Frequency: Daily

Publication: Sakal - Today | Title: As producer responsibility also increases- Saif Ali Khan

# Sakal - Today

# निर्माता म्हणून जबाबदारीत वाढ

## सैफ अली खान याचे उद्‌गार

सकाळ वृत्तसेवा



मुंबई : 'लव्ह आज कल' या चित्रपटात आपण दुहेरी भूमिका साकारली आहे. आतापर्यंत चित्रपटात काम करीत असताना एक अभिनेता म्हणून आपण कधीही नर्व्हस नव्हतो; परंतु आता एक निर्माता म्हणून जबाबदारी वाढलेली आहे. कारण- या चित्रपटावर बऱ्याच जणांची रोजीरोटी अवलंबून आहे, असे उद्‌गार अभिनेता सैफ अली खानने काढले.

'हंगामा डिजिटल'ने आयोजित केलेल्या कार्यक्रमात तो बोलत होता. या वेळी या चित्रपटाचा दिग्दर्शक इम्तियाज अलीदेखील उपस्थित होता. सैफ म्हणाला, की आतापर्यंत चित्रपटांत काम करीत असताना मी एक अभिनेता म्हणून कधीही नर्व्हस नव्हतो. तो चित्रपट चालेल की नाही, याची काळजी वाटत नव्हती; परंतु आता मात्र मनावर मोठे दडपण आहे. कारण 'लव्ह आज कल' या चित्रपटाचा मी निर्माता आहे. माझ्या या चित्रपटावर अनेकांची रोजीरोटी अवलंबून आहे. त्यामुळे तो चालावा, अशीच आपली इच्छा आहे.

सध्या अनेक कलाकार ब्लॉग लिहीत आहेत. 'तूही ब्लॉग लिहिणार का?' या प्रश्नावर तो म्हणाला, की अशा प्रकारच्या ब्लॉगवर आपला विश्वास नाही; परंतु भविष्यात काय घडेल हे सांगता येत नाही. 'लव्ह आज कल'मधील आपली सरदारजीची वेशभूषा करिना कपूरला कमालीची आवडली असल्याचेही त्याने या वेळी आवर्जून सांगितले.



© Sakal - Today